ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख २१ मे, १९५२ | अंक २१

## विविध माहिती

**एक पेनी हप्त्याचें विमापत्रक**— इंग्लंडचे मरहूम राजे सहावे जॉर्ज १९२८ सालीं प्रॉव्हिडेन्शिअल अश्युरन्स कंपनीला भेट देण्यासाठीं गेले होते. त्यावेळीं त्यांचा ९ पौंडांचा विमा उतरण्यांत आला होता. विम्याचा हप्ता दर आठवड्याला एक पेन्स असा होता. राजेसाहेबांच्या मृत्यूनंतर विम्याची रक्कम त्यांच्या एक्झिक्यूटर्सना देण्यांत आली.

**भिक्षेकऱ्यांची पहाणी**—नागपूर शहरांतील सुमारें ७०० भिक्षेकऱ्यांची जी. एस. कॉमर्स ऑफ कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं पहाणी केली. ह्या भिक्षेकऱ्यांत - धंदेवाईक भिक्षेकऱ्यांचा भरणा बराच दिसून आला. कांहीं जण तर ३० वर्षें हाच ' व्यवसाय ' करीत आहेत. बहुतेक भीक मागणारे लग्नें करतात आणि धंदेवाईक भिकाऱ्यांना जन्म देतात. त्यांची प्राप्ति रोज २ आण्यांपासून १ रुपयापर्यंताहि असते.

**ऑस्ट्रेलिआचें आयातीचें धोरण**— ३१ मार्च, १९५२ पर्यंत डॉलरच्या कक्षेंतील देशांतून आयात करण्यास जितक्या किंमतीचे परवाने देण्यांत आले होते, त्या किंमतींत २० टक्के कपात करण्याचें ऑस्ट्रेलिअन सरकारनें जाहीर केलें आहे. एप्रिलपासून सुरू होणाऱ्या सहा महिन्यांच्या कालांताहि अशीच कपात करण्यांत येणार आहे.

**अमेरिकेंतील भारतीय विद्यार्थी**—सध्यां अमेरिकेंत विद्याभ्यासासाठीं गेलेल्या विद्यार्थ्यांत आशिआंतील विद्यार्थ्यांची संख्या सर्वांत जास्त आहे. अमेरिकेंतील २,४०० शिक्षणसंस्थांतून ३०,००० पेक्षां अधिक परकीय विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांपैकीं एक तृतीयांशापेक्षां अधिक आशिआई आहेत. भारतीय विद्यार्थ्यांची संख्या १,१३८ आहे. युरोपमधील ७,२२७ विद्यार्थी अमेरिकेंत शिकत आहेत.

**कृत्रिम पावसासंबंधीं संशोधन**— कृत्रिम पाऊस पाडण्याच्या शक्यतेसंबंधीं सूचना करण्यासाठीं दि कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्चनें एक कमिटी नेमली होती. ह्या कमिटीनें अशी सूचना केली आहे कीं, भारताचें हवामान खातें, नॅशनल फिजिकल लॅबोरेटरी आणि भारतीय विमानदल ह्या सर्वांनीं मिळून सहकार्यानें ह्यासंबंधींचे प्रयोग करावे.

**कैसरच्या पुतण्यानें हॉटेल काढलें**— पहिल्या महायुद्धाचे वेळीं जर्मनांचे बादशहा असलेले विल्हेम कैसर ह्यांच्या पुतण्यानें आतां एक सुखविलासयुक्त हॉटेल काढलें आहे. हॉटेलची इमारत ८ मजले उंच आहे.

**रशिआंतील नवीं शहरें**— रशिआंतील व्होल्गा नदीवर ' न्यू कुइबिशेव्हिस्क ' नांवाचें एक मोठें शहर वसविण्यांत आलें आहे. ह्या ठिकाणीं नदीला धरण घालून वीज निर्माण करण्यांत आली आहे. तीन वर्षांपूर्वीं ज्या जागीं ओसाड मैदान होतें त्याच जागीं आतां डामरी रस्ते, मोठमोठ्या इमारती, वीज, पाणी, इत्यादि सोयींनीं युक्त असें हें शहर उभें करण्यांत आलें आहे. व्होल्गा नदीवर अशींच आणखी पांच शहरें गेल्या तीन वर्षांत बांधण्यांत आलीं आहेत.

**अर्जेंटिना मोटारी तयार करणार**— अर्जेंटिना देशानें आपल्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत टूरिंग मोटारी व मालवाहू मोटारी मोठ्या प्रमाणावर तयार करण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक कामगाराला मोटारसायकल देण्याचा सरकारचा विचार आहे. शहरांतील वाहतूक कंपन्यांना आर्थिक मदत देण्यापेक्षा कामगारांना स्वतःच्या मोटारसायकली देणें अधिक परवडेल, असा सरकारचा अंदाज आहे.

**निलगिरीवरील झाडी**—निलगिरी पर्वतावरील झाडी फार तुटल्यामुळें मद्रास सरकारनें नवीन झाडें लावण्यास उत्तेजन देण्याचें ठरविलें आहे. मद्रास सरकारच्या शेतकी खात्यानें युकॅलिप्टस् झाडाचीं रोपें तयार करण्यासाठीं दोन केंद्रें उघडलीं आहेत. ह्या ठिकाणीं तयार होणारीं रोपें अल्प किंमतींत लोकांना देण्यांत येतील.

**प्रे. ट्रुमन ६८ वर्षांचे झाले**—अमेरिकेचे अध्यक्ष प्रे. ट्रुमन ह्यांच्या वयाला नुकतीच ६८ वर्षें पूर्ण झालीं. गेलीं ७ वर्षें अमेरिकेचे अध्यक्ष ह्या नात्यानें त्यांना फार ताण सहन करावा लागला. तरी सुद्धा त्यांच्याच वयाच्या इतर लोकांपेक्षा त्यांची प्रकृति अधिक चांगली असल्याचें त्यांच्या डॉक्टरनें सांगितलें.

**कराची-मॉस्को रेडिओ टेलिग्राफ**—कराची ते मॉस्को ह्या दोन शहरांच्या दरम्यान रेडिओ-टेलिग्राफ पाठविण्याची व्यवस्था नुकतीच सुरू करण्यांत आली आहे. ह्यापूर्वीं हे संदेशवहनाचें काम लंडनमार्गें होत असे.

**रशिआसाठी ब्रिटनचें कापड**—मॉस्को येथें भरविण्यांत आलेल्या आर्थिक परिषदेंत रशिआनें ब्रिटिश कापडाची मागणी केली होती. त्या मागणीप्रमाणें लँकेशायरच्या गिरण्यांत तयार झालेल्या कापडाचे कांहीं गठ्ठे विमानानें मॉस्कोला रवाना करण्यांत आले. लँकेशायरमधील कापडाच्या गिरण्या अलीकडे मंदीमुळें बंद पडूं लागल्या होत्या.

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

## अधिकृत भांडवल एक कोटी रुपये

सन १९४२ ते १९५१ पर्यंत ऑर्डिनरी शेअरच्या भरलेल्या भांडवलावर सिंडिकेटनें दर वर्षी १० टक्के नफा भागीदारांना दिलेला आहे.

नवीन मशिनरी जानेवारींत सुरू झाल्यामुळें राहिलेल्या उसाची साखर करण्याकरितां कारखाना जून अखेरपर्यंत चालेल.

—: नवीन मशिनरीनें साठ हजार पोतीं साखर :—

**म्हणजे कंट्रोल दरानें अठ्ठेचाळीस लक्ष रुपयांची साखर तयार झाली.**

विजापूर जिल्ह्याला दिलेली:—७,४५४ पोतीं

**बाकी साखर-पोतीं कोठ्यांत विक्रीकरितां शिल्लक आहेत.**

शेअरचे व ठेवींचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

कॉमनवेल्थ बिल्डिंग,
१८० सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड,
पुणें २.
दि. १० मे १९५२.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.,
सी. जी. आगाशे ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स.



# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

## ( शिड्यूल्ड बँक )

**प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग**
पुणें २.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,१९,४८५ |
| खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

श्री. गो. धों. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी.,
मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. २१ मे, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## मुंबई प्रांतिक सहकारी बँकेचा वार्षिक तपशीलवार अहवाल

दि बाँबे प्रॉ. को. बँकेचा, १९५०-५१ चा वार्षिक अहवाल बँकेच्या मॅनेजिंग डायरेक्टरांकडून आमचेकडे आला आहे. सबंध मुंबई राज्यभर बँकेचें कार्यक्षेत्र आहे आणि हिंदी संस्थानांच्या विलिनीकरणानंतर बँकेला नव्या शाखा, विशेषतः उत्तर गुजरातमध्यें उघडून आपला विस्तार वाढवावा लागला. केंद्रीय बँक, ह्या दृष्टीनें तिला मुंबई राज्यांतील सहकारी व आर्थिक जीवनांत अत्यंत महत्त्वाचें स्थान प्राप्त झालेलें आहे. पतवाल्या शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्याचें तिनें पत्करल्यापासून त्या संबंधांत सुसूत्र योजना निर्माण करण्याच्या दृष्टीनें तिचा मुंबई सरकारच्या डेव्हलपमेंट खात्याशीं व रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांशीं निकटचा संबंध आला आहे व येत आहे. त्यांचा प्रांतिक सहकारी बँकेच्या अडचणी समजून घेण्यांत व त्या सोडविण्यासाठी त्या दोघांचेंहि सहाय्य होण्यांत सुपरिणाम होत आहे. सरकारी मदत, रिझर्व्ह बँकेची मदत, शेती-कर्ज पुरवठ्याची व्यवस्था, कार्यक्षेत्र, भाग भांडवल व सभासद, बोर्ड ऑफ डायरेक्टर्स, बँकिंगचा व्यवहार, कर्जाचे व्यवहार, व्यक्तींना कर्जपुरवठा, नफा-तोटा पत्रक, प्राथमिक सोसायट्यांचा कारभार, इत्यादि शीर्षकाखालीं विविध प्रकारचा तपशील प्रस्तुत अहवालांत देण्यांत आला आहे. बँकेच्या बोर्डावर मुंबई सरकारनें प्रा. ध. रा. गाडगीळ ह्यांची 'आर्थिक तज्ज्ञ' म्हणून नेमणूक केलेली आहे. मुंबई राज्यांतील शेती-कर्ज पुरवठ्याचें धोरण आखण्याचें व तें प्रत्यक्षांत उतरविण्यासाठी तपशील ठरविण्याचें श्रेय प्रा. गाडगीळ ह्यांनाच मुख्यतः आहे आणि त्यांच्या सल्ल्याचा बोर्डास फार उपयोग झाला, असें आभारपूर्वक नमूद करण्यांत आलेलें आहे.

प्रस्तुत अहवाल को. कार्टलींच्या आकाराच्या ४९ पृष्ठांचा असून त्यांत रंगीत ग्राफ व तक्ते ह्यांच्या सहाय्यानें बँकेची प्रगति दाखविण्यांत आली आहे. १९५१ सालीं बँकेकडील ठेवींत घट झाली, तरी घेतलेल्या इतर कर्जांत वाढ होऊन खेळतें भांडवल ११३० लक्ष रुपये झालें. प्रांतिक बँकेसकट सर्वच सेंट्रल फि. एजन्सीजना संलग्न संस्थांची कर्जमागणी पुरी पाडणें भाग पडलें, त्या कारणानें त्या सर्वांचेंच रिझर्व्ह बँकेवरील अवलंबन वाढत चाललें आहे. ही परिस्थिति बँकेच्या ह्यापुढील धोरणावर कितपत परिणाम करते आणि तिचें कारभाराचें स्वातंत्र्य कितपत टिकून रहातें, हें तिच्या संचालकांच्या कणखरपणावर अवलंबून रहाणार आहे. बँकेचे चेअरमन, श्री. सरय्या, ह्यांनीं हसन येथील म्हैसूर प्रां. सहकारी परिषदेंत व्यक्त केलेल्या विचारांची कसोटी मुंबई राज्यांतील सहकारी केंद्रीय व इतर संस्थांत लवकरच लागणार आहे. प्रस्तुत अहवाल अत्यंत उद्बोधक असून, तो मुंबई राज्यांतील सहकारी कर्जपुरवठ्याच्या परिस्थितीवर उत्कृष्ट प्रकाश पाडीत आहे. प्रांतिक बँकेच्या ऑ. मॅनेजिंग डायरेक्टरांनीं (श्री. व्ही. पी. वर्दे) इतरांच्या कामगिरीबद्दल अहवालांत गौरव करतांना स्वतःला स्वाभाविकपणानें वगळलें आहे. त्यांनीं ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टरचें काम गेलीं कांहीं वर्षें स्वार्थत्यागपूर्वक व आस्थेनें करून, सहकारी वृत्तीचा धडा घालून दिला आहे, हें येथें नमूद केलें पाहिजे.

---

## भारतांतील पिकांवर अमेरिकन खतांचे प्रयोग

यु. स्टेट्स सरकारनें भारताला १,०८,००० टन खतें द्यावीं व त्याच्या विक्रीतून मिळणाऱ्या रकमेचा विनियोग भारत सरकारनें त्याच्या आर्थिक विकासाच्या योजनांसाठी करावा, असा एक करार उभय देशांत नुकताच झाला आहे. ह्या खतांचा पहिला हप्ता दोन महिन्यांत हिंदी बंदरांत येऊन उतरेल. भारतीय जमिनींत यशस्वी ठरण्याजोगीं नव्या प्रकारचीं खतें लोकप्रिय करणें, हा योजनेचा उद्देश आहे. अमेरिकन सरकार इंडो-अमेरिकन डेव्हलपमेंट फंडास २३ कोटी रु. देणार आहे, त्यांपैकीं ५ कोटी रुपयांचा उपयोग खताच्या पुरवठ्यासाठीं होईल आणि आलेलीं खतें प्रत्यक्ष शेतापर्यंत पोंचविण्यासाठी भारत सरकारला ४४ लक्ष रुपये खर्च येईल. भारताची खतांची आजची वार्षिक आयात ४,४४,००० टनांची आहे आणि सिंद्रीच्या कारखान्याची वार्षिक उत्पादनक्षमता ३,६५,००० टन आहे. प्रस्तुत करारान्वयें भारतास युरिया, नैट्रो फॉस्फेट, अमोनियम सल्फेट, अमोनिअम नैट्रेट, ट्रिपल सुपर फॉस्फेट आणि अमोनिअम नैट्रेट हीं खतें भारतास अमेरिकेकडून मिळणार आहेत. सरकार ठरवील त्या दरानें अमोनियम सल्फेट शेतकऱ्यांना विकलें जाईल. वेगवेगळ्या विभागांतील निरनिराळ्या परिस्थितींतील कित्येक पिकांवर प्रयोग करण्यासाठी व प्रात्यक्षिकांसाठी बाकीचीं खतें वाटण्यांत येतील. कारण, त्या खतांच्या किंमती सामान्य शेतकऱ्याच्या आंवाक्याबाहेरच्या आहेत. फॉस्फेटसचा खतें म्हणून उपयोग करण्यास शेतकऱ्यांना शिकविलें व त्याचा प्रचार केला, म्हणजे सुपरफॉस्फेटच्या हिंदी कारखानदारीस चांगली चालना मिळेल, हें उघड आहे. अमोनिअम सल्फेट सोडून बाकीच्या खतांसंबंधीं प्रयोग अमेरिकन खतें आयात झाल्यानंतर एका वर्षाचे आंत पुरे व्हावेत व त्यांचा अहवाल भारत सरकारकडे दाखल व्हावा, अशी अपेक्षा आहे. अमेरिका देत असलेल्या खतामुळें भारतांतील अन्नपुरवठ्यांत २,००,००० टनांची भर पडेल, असा अंदाज करण्यांत आला आहे.

---

**टाटा कंपनीचा नवा कारखाना**—स्टयुअर्टस् अँड लॉइड ह्या कंपनीच्या सहकार्यानें टाटा कंपनीनें जमशेटपूर येथें स्टील ट्यूब्स् तयार करण्याचा एक नवा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. ह्या कारखान्यासाठी सुरवातीला सुमारें ३ कोटि रुपयांचें भांडवल लागेल. भारतीय सरकारनें ह्या नव्या कारखान्यास पाठिंबा देण्याचें जाहीर केलें आहे. कारखान्यांत दरवर्षी ८०,००० टन वजनाच्या स्टील ट्यूब्स् तयार होतील असा अंदाज आहे.

## फोर्ड फौंडेशन काय कार्य करणार ?

मानवांच्या कल्याणासाठी झटणारी एक फार मोठी संस्था, असें फोर्ड फौंडेशन ह्या अमेरिकन ट्रस्टचें वर्णन करतां येईल. निरनिराळ्या क्षेत्रांत ही संस्था काम करित आहे. हीं क्षेत्रें अशीं:– (१) आंतरराष्ट्रीय शांति (२) लोकशाहीसाठी मदत (३) आर्थिक सुस्थिती साधणारें शिक्षण (४) व मनुष्याच्या वागणुकीविषयींच्या ज्ञानाचा प्रसार. संस्थेची स्थापना १९३६ सालीं झाली. अशा प्रकारचें काम करणारी रॉकफेलर फौंडेशन नांवाचीहि एक संस्था आहे. पण ह्या संस्थेपेक्षांहि फोर्ड फौंडेशनची मालमत्ता अधिक आहे. ह्या मालमत्तेची किंमत सुमारें ५०,००,००,००० डॉलर्स इतकी आहे. इकॉनॉमिक कोऑपरेशन ॲडमिनिस्ट्रेशनचे माजी प्रमुख मि. पॉल हॉफमन यांना संस्थेचा कार्यक्रम अंमलांत आणण्यासाठी निवडण्यांत आलें आहे. मि. हॉफमन हे एक यशस्वी उद्योगपति असून स्वतंत्र वृत्तीचे आहेत. १९५४ सालीं फौंडेशननें २,३०,००,००० डॉलर्स एवढी प्रचंड रक्कम आपल्या कार्यासाठी खर्च केली. अमेरिकेंतील १० मोठ्यांत मोठ्या धर्मादाय संस्थांनीं मिळून इतकीच रक्कम ह्यासाठी खर्च केली होती. संस्थेजवळील निधीपैकीं ५०,००,००० डॉलर्स एवढी रक्कम अमेरिकेबाहेर खर्च करण्यासाठी बाजूला काढून ठेवण्यांत आली आहे. ह्या रकमेंतून पाकिस्तान आणि भारत ह्या दोन देशांतून आदर्श शेती करून दाखविण्यांत येणार आहे. नमुनेदार शेती कशी करावी ह्यासंबंधींचीं प्रात्यक्षिकेंच प्रयोग म्हणून करून दाखविण्यांत येणार आहेत. अन्नधान्याचें उत्पादन सुमारें एकतृतीयांशानें कसें वाढवितां येईल, हें अशा शेतावर सप्रयोग दाखवून देण्यांत येईल. शेतावर वापरण्यांत येणारी कार्यपद्धति कोठल्याहि खेड्यांत वापरतां येईल अशी ठेवण्यांत येईल. पाकिस्तानांत तांत्रिक शिक्षणाची एक शाळा उघडण्यांत येणार आहे. शाळेंत यंत्रें कशीं वापरावीं तें शिकविण्यांत येईल आणि हें शिक्षण दुसऱ्यांना कसें द्यावें त्याचीहि शिकवण देण्यांत येईल.

पॅसिफिक महासागराच्या किनाऱ्यावरील पॅसाडेना येथें संस्थेची मुख्य कचेरी आहे. संस्थेच्या न्यूयॉर्क येथील कचेरींत रोज १०० ते ५०० पत्रें अगर अर्ज येतात, ह्यावरून कार्याचा व्याप किती मोठा आहे त्याची कल्पना येते. फौंडेशननें आपल्या कार्याला प्रत्यक्ष सुरवात १९५० सालीं केली. संस्थेची मालमत्ता ही मालमत्ता ह्या सदरांत रूढार्थानें पडत नाहीं. कारण, मताधिकार नसलेल्या अशा भागांची तिची मालमत्ता आहे, आणि हे भाग खुल्या बाजारांत विक्रीला आलेले नाहींत. दरवर्षी सुमारें २,५०,००,००० डॉलर्स खर्च करतां येतील असें संस्थेनें जाहीर केलें आहे. फोर्ड मोटर कंपनीच्या मूळ संस्थापकांचे नातू दुसरे हेन्री फोर्ड ह्यांनीं ही संस्था स्थापन केल्यानंतर दोन फार महत्त्वाच्या गोष्टी केल्या. त्यापैकीं एक म्हणजे फोर्ड कुटुंबाच्या बाहेरील ट्रस्टी नेमण्याची व्यवस्था. ह्या बाहेरच्या ट्रस्टींमध्यें कार्ल कॉम्प्टन ह्यांच्यासारखे नोबेल पारितोषक मिळविणारे थोर गृहस्थ आहेत. बाहेरचे ट्रस्टी संस्थेनें फोर्ड कुटुंबांतील ट्रस्टींपेक्षा अधिक असतात आणि आपल्या मतांच्या जोरावर त्यांना कुटुंबांतील ट्रस्टींना गुंडाळून 'बुद्धं' ठेवतां येतें. दुसरी गोष्ट म्हणजे अभ्यासकांचा एक गट त्यांनीं निर्माण केला. ह्या गटाला, संस्थेच्या पैशाचा मानवाच्या कल्याणासाठी अधिकांत अधिक चांगला उपयोग कोणता आहे हें सांगण्याचे अमर्याद अधिकार देण्यांत आले आहेत. अभ्यासकांच्या ह्या गटानें खूप परिश्रम करून दोन पुस्तकें लिहिलीं. ॲन्ड्रयू कार्नेजी ह्यांच्या संस्थेनें वाचनालयें बांधण्यास फार मोठी मदत केली. रॉकफेलर फौंडेशननें वैद्यकीय केंद्रें स्थापन केलीं.

फोर्ड फौंडेशननें काय कार्य करावें असा प्रश्न अभ्यासकांच्या गटापुढें होता. शेवटीं त्यांनीं असें ठरविलें कीं पुढील बाबतींत लोकांना शिक्षण आणि मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. एकमेकांशीं सलोख्यानें कसें वागावें, लोकशाही समाजाच्या संघटनेचा फायदा कसा करून घ्यावा, स्वतः शांतीपूर्ण जीवन कसें घालवावें आणि दुसऱ्यांशीं वागतांना शांति कशी पाळावी, इत्यादि. अभ्यासकांच्या गटानें दिलेला अहवाल न मानतां संस्थेला डोळ्यांत भरण्यासारखें लहानसें कार्य करतां आलें नसतें, असें नाहीं. एखाद्या शाळेला संस्थेनें क्रीडांगण घेऊन दिलें असतें अगर एखादें रुग्णालय बांधलें असतें तर लोकांची शाबासकी फौंडेशनला सहज मिळवितां आली असती. पण अशी एखादी कामगिरी करून कराची चुकवाचुकवी केल्याचा आरोप फौंडेशनला स्वतःला लागू करून घेण्याची इच्छा नव्हती. फौंडेशन करीत असलेल्या कार्याचें महत्त्वमापन काळच करूं शकेल. एवढें मात्र खरें कीं स्वतःजवळ असलेल्या पैशाचा जास्तींत जास्त चांगला उपयोग करण्यासाठी फौंडेशन जिवाचें रान करीत आहे.

( हार्पर्स मॅगेझीनमधील रॉबर्ट एल. हीलब्रोनर ह्यांच्या लेखावरून )

---

### पंजाब नॅशनल बँक लि.

वरील बँकेचें खेळतें भांडवल १९५० अखेर पेक्षां १९५१ अखेर १२·७९ कोटी रुपयांनीं वाढलें व तें ६७·५१ कोटी रु. झालें. दिलेल्या कर्जांत ४·१ कोटी रु. ची भर पडून त्यांची रक्कम २१·९९ कोटी रु. झाली. कर्जांचें ठेवींशीं व एकूण जिंदगीशीं प्रमाण अनुक्रमें ४०·७% व ३२·५% पडलें. १९४७ ते १९५१ ह्या मुदतींत आगाऊ कापून घेतलेला इन्कमटॅक्स १·११ कोटी रु. आहे, त्यापैकीं इन्कमटॅक्ससाठीं १८·२५ लक्ष रु. वगळले तर सरकारकडून ९३·२६ लक्ष रुपयांचा रिफंड मिळावयाचा आहे. निव्वळ नफा ३४$\frac{1}{4}$ लक्ष रु. झाला.

---

### देवकरण नानजी इनव्हेस्टमेंट कं. लि.

वरील कंपनीचें वसूल भांडवल २५ लक्ष रु. असून तिचा डिव्हिडंड ई. फंड १,५०,००० रु. आहे. तिनें जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या भागांत २४,३७,०९५ रु. गुंतविले आहेत, त्याची बाजारभावानें किंमत १७,६९,७३५ रु. झाली आहे. १९५० सालीं तिला ७३,११२ रु. नफा झाला होता; १९५१ सालीं तो ४०,५१० रु. झाला. अंडर रायटिंग कमिशन खातीं ताळेबंदांत जिंदगीचे बाजूस १,२७,५०० रु. आहेत. ही रक्कम ९ वर्षांपूर्वी ३,५०,००० रु. होती. डि. ई. फंडांतून ५०,००० रु. रेव्हेन्यू खातीं घेण्यांत येऊन त्यांतून ३% करमाफ डिव्हिडंड देण्यांत येणार आहे.

---

### लंडन परिषदेस जाणारे महाराष्ट्रीय अकौंटंट

लंडन येथें अकौंटिंगची सहावी आंतरराष्ट्रीय परिषद् १६ ते २० जून अखेर भरणार आहे. तिला २७ देशांतील ५०० प्रतिनिधी उपस्थित रहातील. भारतांतून ३१ अकौंटंट जाणार आहेत. त्यांत श्री. एस. बी. दांडेकर ( कलकत्ता ) आणि डी. आर. राणे ( जळगांव ) हीं महाराष्ट्रीय नांवें आढळतात.

---

**जपानमधील बेकायदा संतति**— जपानमध्यें परराष्ट्रांच्या फौजांनीं तळ ठोकल्यापासून परकीय सैनिक आणि जपानी मुली ह्यांच्या बेकायदा संबंधापासून २,००,००० मुलें जन्माला आलीं. ह्या मुलांच्या भवितव्याचा विचार करण्यासाठीं जपानी सरकारनें एक खास कमिटी नेमली आहे.

## दि रत्नाकर बँक लि.

### श्री. बी. बी. पाटील, बी. ए., एलएल. बी., चेअरमन, यांचें ८ व्या वार्षिक सभेच्या वेळचें भाषण

" बँकेची गेल्या पांच वर्षांतील प्रगति खालीलप्रमाणें आहे:—

( आंकडे हजारीं )

| | १९४७ | १९४८ | १९४९ | १९५० | १९५१ |
|---|---|---|---|---|---|
| मुदत ठेव | ७३८ | ७६० | ८९३ | १०२८ | १२१४ |
| सेव्हिंग्ज | ८३१ | ११७७ | १३६९ | १२६१ | १३०९ |
| करंट व इतर | ११०२ | १८६८ | १६८९ | १२१२ | ८९६ |
| एकूण | २६७१ | ३८०५ | ३९५१ | ३५०१ | ३४१९ |

" गेल्या पांच वर्षांत कायम स्वरूपाच्या मुदत ठेवींत सारखी वाढ होत आलेली असून गेल्या वर्षीपेक्षां ती १,८६,००० रु. नीं वाढलेली असून, पांच वर्षांत त्यांत ४,७६,००० रु. ची वाढ झालेली आहे. सेव्हिंग्ज ठेवींमधील वाढ मुख्यतः मध्यम वर्गीयांच्याकडून होत असते. यामुळें ती वाढ माफक प्रमाणांतच आहे. महर्गतेमुळें मध्यमवर्गीयांची बचत संपुष्टांत येत चालली असतांहि गेल्या वर्षापेक्षां त्यांत झालेली वाढ अंदाजे पन्नास हजारांची असून गेल्या पांच वर्षांत त्यांत ४,७८,००० रु. ची वाढ झालेली आहे. करंट ठेवींत झालेला फेरबदल हा मुख्यतः व्यापाऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीचा आरसा आहे. त्यांची नाणेभीड जसजशी वाढत गेली, त्यांचें लोकांचेकडील येणें जसजसें थकत गेलें, त्यांच्या नफ्यांचें प्रमाण कमी होऊन खर्च जसजसे वाढत गेले व सरकारी नियंत्रणामुळें व अस्थिर परिस्थितीमुळें अपेक्षेप्रमाणें तेजी–मंदी मिळेनाशी झाली, तसतसा त्याचा परिणाम बँकिंग क्षेत्रांतील करंट ठेवींवर झाला असें एकच अनुमान निघतें.

" एकूण शेड्यूल्ड बँकांच्या मुदत ठेवींत गेल्या वर्षी ८ कोटी रु. वाढ झाली. त्याचप्रमाणें ती आपल्या बँकेंतही झाली. एकूण शेड्यूल्ड बँकांच्या करंट ठेवींत गेल्या वर्षी ३२ कोटींची घट झाली व त्यास अनुसरून आपल्या बँकेच्या करंट ठेवीमध्येंही अंदाजे ३ लक्ष रुपयांची घट झाली आहे. व्यापार व व्यापाऱ्यांची परिस्थिती हेंच मुख्यतः या घटीस कारण आहे. एकूण ठेवींची परिस्थिती पहातां त्यांत गेल्या वर्षापेक्षां कांहींच विशेष बदल झालेला नाहीं; उलट स्थिर स्वरूपाच्या ठेवी चांगल्या प्रमाणांत वाढल्यामुळें बँकेस अधिक स्थैर्य निर्माण झालें आहे.

### कर्जावर निर्बंध—रोख्यांच्या किंमतींत घसारा

" बँकेकडून व्यापाऱ्यांना मिळणाऱ्या कर्जावर अनेक निर्बंध निरनिराळ्या स्वरूपानें घातले गेले. जीवनोपयोगी वस्तूंचा सांठा करून त्या वस्तू बाजारांत दुर्भिळ करून त्यांच्या किंमतींत वाढ करणेंस मदत करणाऱ्या व्यापाऱ्यांना कर्जें न देणें, सट्टयाचा व्यवहार करून किंमतींत कृत्रिम वाढ करणाऱ्या व्यापाऱ्यांना कर्जें न देणें, चोरट्या मार्गानें देशांत येणाऱ्या सोन्यासारख्या वस्तूंच्या गहाणावर कर्जाचें प्रमाण मर्यादित करणें व बिनतारण कर्जाचें किंवा अंगावरील कॅशक्रेडिट कर्जाचें प्रमाण एकूण कर्जाच्या फक्त ३० ते ४० टक्के एवढेंच ठेवणें, अशा निरनिराळ्या उपायांनीं व हे निर्बंध शक्य तो लागलीच परिणामकारक ठरावेत म्हणून १५ नोव्हेंबर १९५१ रोजीं १९३५ सालापासून कायम असलेल्या रिझर्व बँकेच्या व्याजाच्या दरांत बदल करणेंत येऊन तो ३½ टक्के करणेंत आला. या घटनेमुळें सरकारी कर्ज रोख्यांच्या किंमतींत फार मोठ्या प्रमाणांत घट निर्माण झाली. एकूण घट अंदाजे रु. ६० कोटींची असावी असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. अर्थातच, सर्व बँकांच्या कर्जरोख्यांच्या किंमतींत घसारा निर्माण होणें क्रमप्राप्तच झालें. हा घसारा म्हणजे कसल्याही प्रकारचा प्रत्यक्ष तोटा नसून असलेले कर्जरोखे विकण्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्यास चालू बाजारभावानें किती तोटा येणें शक्य आहे, त्याचें निदर्शक आहे.

" आपल्या बँकेंतील कर्जरोख्यांची गुंतवणूक खालीलप्रमाणें आहे—

एकूण गुंतवणूक– [ आंकडे हजारी ]

| १९४७ | १९४८ | १९४९ | १९५० | १९५१ |
|---|---|---|---|---|
| २०८ | ६०९ | ७५७ | ७५७ | १२५२ |

"गेल्या पांच वर्षांत सरकारी कर्जरोख्यांच्या गुंतवणुकींत एकूण वाढ १० लक्षाहून अधिक झालेली असून बँकेच्या तरतेपणांत तेवढी भर पडलेली आहे. सदर कर्जरोख्यांपैकीं निम्म्यापेक्षां अधिक कर्जरोखे येणाऱ्या आठ वर्षांच्या मुदतींतील असून बाकीचे थोड्या लांब मुदतीचे आहेत.

### बँकेच्या व्यवहाराची प्रगति

" बँकेच्या वट्ट उत्पन्नांत आतांपर्यंत सारखी वाढ होत गेलेली आहे. गेल्या पांच वर्षांत एकूण उत्पन्नांत ९४,१००रु. इतकी वाढ झाली आहे. १९४७ सालच्या वट्ट उत्पन्नाच्या जवळ जवळ पावणे दोन पट वट्ट उत्पन्न १९५१ सालीं झालें आहे. १९४९ सालापासून बँकेनें अंगावरील कर्जांत सारखी कपात केलेली असून, तारण कर्जाचें प्रमाण वाढविलें आहे.

"बँकेच्या शाखांपैकीं कोणतीहि शाखा नुकसानींत तर नाहींच, उलट नागरिकांच्या वाढत्या विश्वासामुळें व सहकार्यामुळें फायद्यांत उत्तरोत्तर वाढच होत आहे. आतांपर्यंत रिझर्व्ह व इतर फंड मिळून रुपये ७५,००० ची रक्कम १९५१ अखेरच्या ताळेबंदांत दिसते व १९५१ सालच्या नफ्यांतून अंदाजे रु. १४,५०० इतकी रक्कम वरील फंडास काढलेली आहे. म्हणजे १९५२ अखेर रिझर्व्ह व इतर फंड मिळून अंदाजे ९०,००० रु. होईल.

### मंदीचा बँकेवर दुष्परिणाम नाहीं

"गेल्या फेब्रुवारीच्या अखेरीपासून निरनिराळ्या मालांच्या किंमतींमध्यें झालेल्या अनपेक्षित घटीमुळें व्यापारी वर्गावर मोठेंच संकट आलेलें आहे. आपले व्यवहार आपल्या शक्तीपलिकडे ज्यांनीं ठेविलेले होते, त्यांची परिस्थिति नाजूक झालेली आहे. उपलब्ध पैशाचे मानानें केलेले भरमसाट व्यवहार, नाणेबाजारांतील तंगी व बँकांचा मुक्तहस्तें कर्जें देण्यास नकार यामुळें बाजारांत मंदी निर्माण झाली आहे. सुमारें १५ वर्षांनंतर आलेल्या या मंदीच्या लाटेचा परिणाम आपल्या बँकेच्या व्यवहारावर किंचितहि झाला नाहीं, हें कळविणेंस अत्यंत अभिमान वाटतो.

"ता. ३१ मार्च, १९५२ अखेर हळद व गूळ यांचे गहाणावर बँकेची कोणतीहि बाकी येणें राहिलेली नाहीं, सोनें गहाणावर दिलेल्या रकमा संपूर्ण मार्जिनमध्यें आहेत व बिन–तारणावर दिलेल्या कॅशक्रेडिट व मुदत हुंडी खातेदारांना दिलेल्या कर्जांत जानेवारीमध्येंच २५ टक्के कपात केल्यामुळें तीं कर्जें अत्यंत सुरक्षित स्वरुपाचीं राहिलीं आहेत. त्यामुळें बँकेचा व्यवहार अत्यंत दक्षतेनें चालला आहे, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं व या बाबतींत आपण सहमत रहाल अशी आशा वाटते. "

# THE RATNAKAR BANK LIMITED, KOLHAPUR

***Balance Sheet as at 31st December 1951***

## CAPITAL AND LIABILITIES

| | Rs. | As. | Ps. | Rs. | As. | Ps. |
|---|---|---|---|---|---|---|
| **1. Capital:-** | | | | | | |
| **Authorised Capital** | | | | | | |
| 20,000 Ordinary Shares of Rs. 100 each ... | 20,00,000 | 0 | 0 | | | |
| 120 Deferred Shares of Rs. 100 each ... | 12,000 | 0 | 0 | 20,12,000 | 0 | 0 |
| **Issued Capital** | | | | | | |
| 10,000 Ordinary Shares of Rs. 100 each ... | 10,00,000 | 0 | 0 | | | |
| 120 Deferred Shares of Rs. 100 each ... | 12,000 | 0 | 0 | 10,12,000 | 0 | 0 |
| **Subscribed Capital** | | | | | | |
| 9,954 Ordinary Shares of Rs. 100 each ... | 9,95,400 | 0 | 0 | | | |
| 112 Deferred Shares of Rs. 100 each ... | 11,200 | 0 | 0 | 10,06,600 | 0 | 0 |
| **Amount Called up at Rs. 50/- per share:** | | | | | | |
| 9,954 Ordinary Shares of Rs. 100 each ... | 4,97,700 | 0 | 0 | | | |
| 112 Deferred Shares of Rs. 100 each ... | 5,600 | 0 | 0 | 5,03,300 | 0 | 0 |
| **2. Reserve Fund & Other Reserves:** (including additions) | | | | | | |
| Reserve Fund ... | 61,000 | 0 | 0 | | | |
| Bad Debt Fund ... | 1,000 | 0 | 0 | | | |
| Building Fund ... | 605 | 0 | 0 | | | |
| Investment Fluctuation Fund ... | 12,419 | 0 | 0 | 75 024 | 0 | 0 |
| **3. Deposits And Other Accounts** | | | | | | |
| Fixed Deposits ... | 12,14,468 | 9 | 9 | | | |
| Savings Bank Deposits ... | 13,09,135 | 8 | 8 | | | |
| Current Accounts, and Contingency (unadjusted) accounts | 8,95,687 | 13 | 3 | 34,19,291 | 15 | 8 |
| **4. Borrowing from Other Banking Companies, Agents, Etc.** | | | | | | |
| (1) In India ... | 505 | 8 | 9 | | | |
| (2) Outside India ... | Nil | | | 505 | 8 | 9 |
| Particulars :— ... | | | | | | |
| (1) Secured By part of the Bank's Investments in Govt. securities per contra ... | 505 | 8 | 9 | | | |
| (2) Unsecured ... | Nil | | | | | |
| **5. Bills Payable** | | | | 4,703 | 2 | 0 |
| **6. Bills For Collection being Bills Receivable** as per Contra | | | | | | |
| (1) Payable in India ... | 1,57,866 | 12 | 6 | | | |
| (2) Payable Outside India ... | Nil | | | 1,57,866 | 12 | 6 |
| **7. Other Liabilities** | | | | | | |
| (1) Unpaid Dividends ... | 2,642 | 3 | 9 | | | |
| (2) Rebate on Bills Discounted ... | 760 | 4 | 6 | | | |
| (3) Branch Adjustments ... | 1,913 | 14 | 0 | | | |
| (4) Provision for taxation ... | 1,289 | 9 | 0 | | | |
| (5) Sundry Credits ... | 13,071 | 5 | 9 | 19,677 | 5 | 0 |
| **8. Acceptances, Endorsements, Other Obligations,** Per contra ... | | | | Nil | | |
| **9. Profit And Loss** | | | | | | |
| Balance as per last Balance Sheet ... | 49,427 | 7 | 3 | | | |
| *Less*: Appropriation thereof: | | | | | | |
| Reserve Fund ... 10,000—0—0 | | | | | | |
| Dividends on Deferred Shares ... 1,407—0—0 | | | | | | |
| Dividends on Ordinary Shares ... 14,898—9—9 | | | | | | |
| Provision for Taxation ... 23,000—0—0 | 49,305 | 9 | 9 | | | |
| Balance carried forward | 121 | 13 | 6 | | | |
| *Add*: Profit for the year (Subject to taxation) brought... from the P. & L. a/c | 41,535 | 9 | 0 | 41,657 | 6 | 6 |
| Total Rs... | | | | 42,22,026 | 2 | 5 |

( See Profit and Loss Account on Page 172 )

# THE RATNAKAR BANK LIMITED, KOLHAPUR.

*Balance Sheet as at 31st December 1951*

## PROPERTY AND ASSETS

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Cash:** In hand and with Reserve Bank and Imperial Bank ... | | 7,28,034 8 5 |
| **2. Balances With Other Banks in Current Deposit Accounts** | | |
| (1) In India ... | 3,44,763 0 9 | |
| (2) Outside India ... | Nil | 3,44,763 0 9 |
| **3. Money At Call And Short Notice** | | Nil |
| **4. Investments at Cost** | | |
| (1) Government of India and Trustee Securities of the Central Govt. of the face value of Rs. 12,57,000/- The Securities of the face value of Rs. 10,20,000/- lodged with Banks for overdraft arrangements (Market value Rs. 11,30,200/-) | 12,51,883 1 0 | |
| (2) Shares | Nil | |
| (3) Debentures or Bonds ... | Nil | |
| (4) Other investments ... | Nil | |
| (5) Gold ... | Nil | 12,51,883 1 0 |
| **5. Loans, Advances, Cash Credits & Overdrafts** | | |
| (1) (Other than bad and doubtful debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors)... | | |
| (i) In India ... | 13,23,424 13 8 | |
| (ii) Outside India ... | Nil | |
| (2) Bills Discounted & purchased (excluding Treasury Bills of the Central and State Governments) | | |
| (i) Payable in India ... | 3,33,826 9 7 | |
| (ii) Payable outside India ... | Nil | 16,57,251 7 3 |
| **Particulars Of Advances:-** | | |
| (1) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured ... | 10,04,302 7 2 | |
| (2) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the Debtors' personal security. ... | 5,37,403 5 6 | |
| (3) Debts considered good, secured by the Personal liability of one or more parties, in addition to the personal security of the Debtors. ... | 1,14,945 10 7 | |
| (4) Debts considered doubtful or bad, not provided for ... | Nil | |
| | 16,57,251 7 3 | |
| (5) Debts due by Directors or Officers of the Bank or any of them either severally or jointly with any other person ... | 12,749 6 9 | |
| (6) Debts due by Companies or firms in which the Directors of the Bank are interested as Directors, Partners or Managing Agents or, in the case of the private companies, as members ... | 2,555 1 6 | |
| (7) Maximum total amount of loans including temporary advances made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Company ... | 24,727 15 9 | |
| (8) Maximum Total amount of loans including temporary advances, granted during the year to the Companies or Firms in which the Directors of the Bank are interested as Directors, Partners or Managing Agents, or in the case of private companies as members ... | 60,497 8 6 | |
| (9) Due from Banks ... | Nil | |
| **6. Bills For Collection Being Bills Receivable as per contra** | | |
| (1) Payable in India ... | 1,57,866 12 6 | |
| (2) Payable outside India ... | Nil | 1,57,866 12 6 |
| **7. Acceptances, Edorsement and Other Obligations per contra** | | Nil |
| **8. Building Plot at cost** | | 4,560 0 0 |
| **9. Furniture And Fixtures at cost** | 34,966 0 6 | |
| Additions during the year | 3,184 11 9 | |
| | 38,150 12 3 | |
| *Less*: Total Depreciation writting off | 12,443 15 9 | 25,706 12 6 |
| **10. Other Assets:** | | |
| Advance payment of Income tax and Income tax deductions at source ... | 33,388 10 0 | |
| Stamps and unconsumed stock of stationery ... | 7,091 2 3 | |
| Sundry payments ... | 2,214 8 6 | |
| Interest accrued on Investments, but not collected ... | 9,266 3 3 | 51,960 8 0 |
| **11. Non-Banking Assets Acquired In Satisfaction Of Claims** | | Nil |
| Total Rs. ... | | 42,22,026 2 5 |

(See Profit and Loss Account on Page 173)

# THE RATNAKAR BANK LIMITED, KOLHAPUR.

*Profit and Loss Account for the Year ended 31st December 1951*

| EXPENDITURE | Amount | INCOME (Less provision made during the year for bad & doubtful debts & other usual and necessary provisions) | Amount |
|---|---|---|---|
| | Rs. As. Ps. | | Rs. As Ps. |
| To Interest paid on Deposits, Borrowings, etc. ... | 76395 14 9 | By Interest and Discount ... | 197835 14 9 |
| " Salaries, Allowances & Pro. Fund : | | " Commission, Exchange and Brokerage ... | 24439 5 5 |
| " (1) To Manager 5731-14-0<br>(2) To Staff 66450-7-9 | 72182 5 9 | " Rents ... | Nil |
| " Directors' Fees, Local Committee Members' Fees and Allowances ... | 4823 0 0 | " Net profit on sale of Investments, Gold & Silver, Land, Premises and other assets. (not credited to Reserves or any particular Fund or account) ... | Nil |
| " Rent, Taxes, Insurance, Lighting Etc., ... | 5233 10 9 | | |
| " Law charges ... | 431 0 0 | " Net profit on revaluation of Investments, Gold and Silver, Land, Premises and other assets (not credited to Reserves or any particular Fund or Account) ... | Nil |
| " Postage, Telegrams, Telephones and Stamps. ... | 3953 13 6 | | |
| " Auditors' Fees ... | 1300 0 0 | " Income from non-banking assets, and profit from sale of or dealing with such assets ... | Nil |
| " Depreciation on Bank's Property ... | 1960 15 3 | | |
| " Stationery, Printing, Advertisement, Etc. ... | 8828 7 6 | " Other receipts:<br>Transfer Fees 42-0-0<br>Misce. Receipts 1233-6-0 | 1275 6 0 |
| " Other Expenditure:<br>(1) Miscellaneous Expenses 5114-14-2<br>(2) Travelling Expenses 1790-15-6 | 6905 13 8 | | |
| " Balance of Profit, (subject to taxation) ... | 41535 9 0 | | |
| Total Rs. ... | 223550 10 2 | Total Rs. ... | 223550 10 2 |

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHARE-HOLDERS

We have audited the foregoing Balance Sheet of the Ratnakar Bank Ltd., Kolhapur as at 31st December 1951, and also the foregoing Profit and Loss Account of the Bank for the year ended upon that date, in which are incorporated audited accounts of the branches and report that:—

(a) we have obtained all the information and explanations we have required and have found them to be satisfactory; (b) The transactions of the Bank which have come to our notice have been within the powers of the Bank; (c) The Returns received from Branch Offices of the Bank have been found adequate for the purpose of audit; (d) In our opinion, the foregoing Balance Sheet and Profit and Loss Account are drawn up in conformity with the law; (e) Such Profit and Loss Account shows a true balance of Profit for the year; (f) Such Balance Sheet exhibits a true and correct view of the state of affairs of the Bank according to the best of our information and the explanations given to us and as shown by the books of the Bank and (g) In our opinion, the books of account have been kept by the Bank as required by Section 130 of the Indian Companies Act, 1913.

KOLHAPUR, 20th March 1952.

Sd/- Kulkarni & Khanolkar,
Chartered Accountants.

**A. P. Patil,** *Asst. Manager,* **L. N. Shah,** *Manager,* **G. S. Chaugule** *Vice Chairman.*

## DIRECTORS

**B. B. Chaudhari, D. Y. Mencha, M. B. Chaugule, D. A. Mangaj, A. D. Khot, A. A. Patil, S. B. Dugge, S. T. Vankudre, M. S. Karale, H. B. Patil, J. V. Arwade,**

*Note:*— Shri B. B. Patil, did not sign the Balance Sheet as he was out of station.

( See Balance Sheet on Pages 170 and 171 )

### कलकत्ता बंदराचा विकास

भारताचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी जीं मोठमोठीं कामें करण्यांत येणार आहेत, त्यांच्यासाठी परदेशाहून अवजड यंत्रसामुग्री कलकत्ता बंदरांत येऊं लागली आहे. परंतु ती उतरून घेण्यासाठी जरूर असलेल्या मोठ्या याऱ्या नसल्या-मुळें बरीच अडचण भासत आहे. अवजड यंत्रसामुग्री बोटीवरून उतरून घेण्यासाठी कलकत्ता बंदरांत दोनशे टनी विजेची एक यारी लवकरच बसविण्यांत येणार आहे. अशा प्रकारची यारी भारतांत प्रथमच वापरण्यांत येणार आहे. यारीसाठी एका जर्मन कारखान्याकडे मागणी नोंदविण्यांत आली आहे. तिची किंमत सुमारें ४० लाख रुपये असेल. मध्यवर्ती नियोजन मंडळानें कलकत्ता बंदराच्या विकासाचा जो कार्यक्रम आंखला आहे त्यांतच नव्या विजेच्या याऱ्या बसविण्याचा समावेश करण्यांत आला आहे. बंदराच्या विकासासाठी एकूण सुमारें २५ कोटी रुपये खर्च व्हावयाचे आहेत. परकीय देशांतून आयात करण्यांत येणारी यंत्रसामुग्री उतरविण्याच्या कामीं सध्यां फार कष्ट पडतात. भाक्रा येथील विद्युत्-केंद्राची कांहीं अवजड यंत्रसामुग्री बंदरांत नुकतीच उतरून घेण्यांत आली; पण तेव्हां तात्पुरती योजना करतांना बंदराच्या अधिकाऱ्यांची फार त्रेधा उडाली, असें समजतें. सध्यां चालू असलेल्या बहुतेक याऱ्या जुन्या झालेल्या असून त्या १२५ टनांपेक्षां अधिक वजन उचलूं शकत नाहींत. कलकत्ता येथील व्यापारी वाहतूक अलीकडे फार वाढली आहे. त्यामुळें बंदराची कार्यक्षमता अधिक वाढविणें अतिशय निकडीचें झालें आहे.


### म्हैसूरमध्यें वीज-कपात

कृष्णराजसागर तलावांतील पाणी खालीं गेल्यामुळें शिवसमुद्रम वीजकेंद्रास, वीज-निर्मितीसाठी आवश्यक तेवढें पाणी उपलब्ध करून देणें अशक्य झालें आहे. पाऊस वेळेवर न पडल्यामुळें व पाणी संपूं लागल्यामुळें म्हैसूर सरकारनें शिवसमुद्रम व शिमशापूर येथून पुरविण्यांत येत असलेल्या विजेच्या खपांत २०% कपात १५ मे पासून अमलांत आणली आहे. तलावांतील पाण्याची खोली ८६ फुटांहूनहि कमी झाली आहे आणि शिवसमुद्रमला दररोज १०५० क्युसेक्स पाणी दिलें जाई, त आतां ९०० क्युसेक्सच दिलें जाईल. वीजकपातीमुळें बंगलोर, मंड्या, टुमकूर व कोलार येथील कारखानदारांवर दुष्परिणाम होईल. ताज्या बातमीप्रमाणें, ही कपात तूर्त रद्द करण्यांत आली आहे, कारण धरणाचे भागांत थोडा पाऊस झाला आहे.

### ट्रॅक्टर्सची डॉलर-कमाई

एम्प्रेस ऑफ ब्रिटन ह्या बोटीनें लिव्हरपूल येथून १५,००० फर्ग्युसन ट्रॅक्टर्स कॅनडाकडे नुकतेच रवाना झाले. गेल्या चार वर्षांत फर्ग्युसन ट्रॅक्टर्सनीं ग्रेट ब्रिटनला उत्तर अमेरिकेच्या बाजारपेठेंतून सुमारें २ कोटी, ८० लक्ष डॉलर्स मिळवून दिले आहेत.

**गौरी शंकर शिखरावर चढण्यासाठी—** गौरी शंकर ह्या हिमालयाच्या अत्युच्च शिखरावर चढण्यासाठी १९५५ सालापर्यंत दरवर्षी एक ह्याप्रमाणें मोहिमा काढण्यांत येणार आहेत. नेपाळचें सरकार दरवर्षी एकाच मोहिमेला परवानगी देत असल्यामुळें परकीय आरोहकांच्या टोळ्यांचे एकामागून एक नंबरच लावण्यांत आले आहेत.

SAVE to help yourself and the NATION
WITH THE
HOME SAFE

THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
*Branches:* Dadar, Mahim, Poona & Belgaum

### डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स, पुणें,

#### त्रैमासिकाचा उपक्रम

इन्स्टिटयूटचें एक छापील नियतकालिक काढावें, अशी चालकांची बरींच वर्ष कल्पना होती, ती आतां मूर्त स्वरूपांत आली आहे. इन्स्टिटयूटच्या उपयुक्ततेंत त्यामुळें भर पडली आहे आणि तिचे माजी व आजी विद्यार्थी ह्यांच्या शिक्षणसाधनांत उपयुक्त वाढ झाली आहे. संस्थेच्या हितचिंतकांस हे संस्थेच्या प्रगतीची कल्पना येत राहण्यास त्रैमासिक उपयोगी पडेल. ( संपादक:–१ अरविंद जी. भोपटकर, बी. कॉम व २ वसंत डी. रिसबुड, बी. ए, डी. कॉम. वार्षिक वर्गणी २ रु. पत्ता : ५९४, बुधवार, पुणें २. )

### रत्नागिरी जिल्हा दक्षिण विभाग सहकारी परिषद्

रत्नागिरी जिल्हा सहकारी बोर्डातर्फे मु. कणकवली येथें दिनांक ३० व ३१ मे १९५२ रोजीं सहकारी परिषद् भरविण्याचें निश्चित झालें आहे. मुंबई प्रांतिक सहकारी संस्थेचे ऑनररी सेक्रेटरी व मुंबई प्रांतिक सहकारी बँकेचे ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वा. पुं. वर्दे यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें कबूल केलें आहे.

## TENDER NOTICE

Sealed Item Rate Tenders are invited from reputed building contractors for the construction of a building on No. 93/2-B, Budhwar Peth, Laxmi Road, Poona City, estimated approximately at Rupees three lakhs, for the Bharat Industrial Bank Ltd., Poona. Tender forms and drawings can be had from the office of the undersigned on payment of Rs. 10/-, during office hours upto 20th May, 1952. The last date of submission of tenders is 22nd May, 1952. The undersigned or the owners do not bind themselves to accept the lowest or any tender.

**Sant Ghoting & Dongre,**

Architects & Engineers,
Laxmi-Sadan,
Jangli Maharaj Road,
Poona 4.

### सेक्रेटरीज ट्रेनिंग क्लास, मंचर, जि. पुणें

आंबेगांव तालुक्यांतील सहकारी सोसायट्यांच्या सेक्रेटरीसाठीं दोन महिन्यांचा ट्रेनिंग क्लास घेतला होता. परीक्षेस २३ विद्यार्थी बसले होते. पैकीं पहिले दोन सेकंडक्लासमध्यें व उरलेले ८ पास क्लासमध्यें उत्तीर्ण झाले. यशस्वी उमेदवारांचीं नांवें:— (१) हरीभाऊ मारुती एरंडे (२) दत्तात्रय बाबूराव राहाणे (३) दगडू यशवंत वाबळे (४) शंकर नारायण कुरडे (५) मधुकर नरहर कुलकर्णी (६) बबन महिनाजी काळे (७) नारायण कोंडाजी दिमते (८) रंगनाथ गणपत वानाखिले (९) दत्तात्रय भिवसेन आरगडे (१०) विष्णू तबाजी वायळ.

ता. ४ मे १९५२ रोजीं मंचर येथें सुपरवायझिंग युनियनचे ऑफिसांत पुणें सेंट्रल को. बँकेच्या मंचर शाखेचे एजंट श्री. बबनराव मुळे यांचे हस्तें यशस्वी विद्यार्थ्यांना सर्टिफिकेटस् देण्यांत आलीं. त्या वेळीं तालुक्यांतील सोसायट्यांचे सेक्रेटरी, चेअरमन, पंच वगैरे मिळून सुमारें ५०।६० मंडळी हजर होती. श्री. के. बी. देशपांडे, को. ट्रे. इन्स्पेक्टर यांनीं प्रास्ताविक भाषण केल्यावर श्री. माठे, श्री. थिटे व श्री. आरगडे यांचीं विद्यार्थ्यांना उद्देशून भाषणें झालीं व शेवटीं अध्यक्ष श्री. मुळे यांनीं प्रसंगोचित समारोप केला व सभा संपली.

### सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास, पौड

पुणें जिल्ह्यांतील मागासलेल्या मुळशी भागांत ता. १६-२-५२ ते १६-४-५२ अखेर सहकारी सोसायट्यांच्या सेक्रेटरीसाठीं ट्रेनिंग क्लास पौड येथें घेतला होता. परीक्षेस १४ विद्यार्थी बसले होते त्यांतील ७ पास झाले:—

| | सहकार | कायदा | जमाखर्च | एकूण | क्लास |
|---|---|---|---|---|---|
| १ नातू वि. कृ. | ६१ | ५८ | ६५ | १८४ | फ.क्ला. |
| २ मंडले लिं श्री. | ४७ | ४५ | ६९ | १६१ | से. क्ला. |
| ३ बुरबुडे शा. भु. | ४९ | ५४ | ६८ | १७१ | ,, |
| ४ सरनाईक प्र. शं. | ५४ | ४४ | ६२ | १६० | ,, |
| ५ कुंभार रा. गे. | ४८ | ३५ | ५८ | १४१ | पास |
| ६ गुजराथी मोहनलाल | ४२ | ३५ | ५८ | १३५ | ,, |
| ७ माझिरे कों. ग | ४६ | ४४ | ५५ | १४५ | ,, |

### विद्यार्थ्यांवर गृहपाठाची सक्ती बेकायदा ?

शाळेंतील शिक्षक विद्यार्थ्यांस घरीं करण्यासाठीं अभ्यास देतात, तो कायदेशीर आहे किंवा नाहीं ह्याविषयीं शंका असल्यानें, कोणत्याहि शाळेच्या हेडमास्तरानें त्याबाबत सक्ति न करणें बरें असा इशारा इंग्लंडमधील नॅशनल युनियन ऑफ टीचर्सच्या "दि स्कूल मास्टर" ह्या मुखपत्रानें दिला आहे. प्रत्येक विद्यार्थ्यानें गृहपाठ केलाच पाहिजे, असा उघड आग्रह करूं नये, असें त्यानें सुचविलें आहे. ज्या विद्यार्थ्यांचे पालक मुलास गृहपाठ करूं देत नाहींत अशा विद्यार्थ्यास शिक्षा करणें अयोग्य होईल, असेंहि सुचविण्यांत आलें आहे. "गृहपाठ वैकल्पिक ठेवावा" असें मत युनियनच्या सॉलिसिटरनें व्यक्त केलें आहे.

### तागाच्या निर्गतीवरील जकात कमी केली

हिंद सरकारनें तागाच्या मालावरील निर्गत जकाती आणखी कमी केल्या आहेत. यापुढें तिचा केवळ उत्पन्नासाठीं जकात म्हणूनच विचार केला जाईल. तागाच्या बाबतींत खरेदीदारांची बाजारपेठ अलिकडे निर्माण झाली आहे. बंगाल व इतर राज्यांतील तागाचें पीक सुधारत आहे. जकात कमी केल्यामुळें सरकारी तिजोरीचें उत्पन्न बरेंच घटण्याचा संभव आहे.


## ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता: 'PEDNECO' Bombay

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा:

ब्रँच सेक्रेटरी.

## दि युनायटेड कमर्शिअल बँक लि.

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६७½ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला (चेअरमन)

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

## सरकारी कर्जरोख्यांचा भाव सुधारला—भावी आशावाद

( भा. म. का. )

पुढील वर्षाचें म्हणजे १९५२–५३ चें अंदाजपत्रक तयार करतांना अर्थमंत्र्यांनीं रु. ५० कोटी कर्ज खुल्या बाजारांत उभारावयाचें जाहीर केलें. सरकारी कर्ज-उभारण्याची गेल्या ३–४ वर्षांतील परिस्थिति समाधानकारक नव्हती. यामुळें रु. ५० कोटींचा नेमस्त अंदाज करण्यांत आला असावा. परंतु पुढील वर्षीं कदाचित सरकारला खुल्या बाजारांत कर्ज उभारण्याचा प्रसंगहि येणार नाहीं असें मत नुकतेंच कलकत्त्याच्या इंडिअन फिनॅन्स या सुप्रसिद्ध पत्रानें व्यक्त केलें आहे. या पत्राची विचारसरणी अशी कीं, एप्रिल अखेर सरकारी कर्जरोख्यांचे भाव सुधारत आहेत. १९८६ चें ३ टक्के दरांचें कर्ज रु. ८०·१२ आणे या भावावरून रु. ८२·७ आणे पर्यंत चढलें आहे. १९७०–७५ च्या कर्जरोख्यांचा भाव रु. ८६ वरून रु. ८६·१२ आणे पर्यंत चढला आहे. १९५३–५५ चे ३ टक्के दरांचे कर्जरोखे ९९ रु. ११ आण्यांवरून रु. १०० पर्यंत चढले आहेत. एप्रिल अखेर झालेल्या या कर्जरोख्यांच्या भावांतील सुधारणेवरून सरकारी कर्जरोख्यांचे भाव यापुढें सुधारतच जातील असें अनुमान निघतें. आलिकडे हिंद सरकारला परदेशांतून कर्जे व मदत मिळण्याच्या बाबतींत चांगलें यश मिळत आहे. अमेरिकेकडून आतांपर्यंत सुमारें रु. ३८० कोटींची मदत मिळाली आहे. मि. चेस्टर बौल्स ह्या हिंदमधील अमेरिकन सरकारच्या वकिलांनीं वर्षाला २५ कोटी डॉलर मदत चार वर्षें हिंदला मिळावी अशी सूचना अमेरिकन सरकारला केली आहे. या सूचनेस यश आल्यास वर्षाला सुमारें रु. १२० कोटी मदत मिळूं शकेल. सरकारी खर्चाची परिस्थिति, मिळूं शकणाऱ्या ह्या संभवनीय मदतीमुळें बरीच सुधारण्याची शक्यता दिसते. सरकारी कर्जरोख्यांचा एप्रिल अखेर सुधारलेला बाजारभाव आशाजनक दिसतो. तेव्हां १९५३ पर्यंत सरकारनें खुल्या बाजारांत कर्ज उभारलें नाहीं तरी चालू शकण्यासारखें आहे. रिझर्व्ह बँकेनेंहि सरकारी कर्जरोख्यांची स्वतःची विक्री थांबवावी. म्हणजे खुल्या बाजारांतून गुंतविणारांना कर्जरोखे विकत घ्यावे लागतील. विमाकंपन्यांना ठराविक प्रमाणांत सरकारी कर्जरोख्यांत पैसे गुंतवावे लागत असून, प्रचलित बाजारभावाप्रमाणें त्यांची किंमत आकारावी लागते. यामुळें विमाकंपन्याहि सरकारी कर्जरोख्यांची उचल जास्त प्रमाणांत करतील. संलग्न बँकांच्या सरकारी कर्जरोख्यांतील ठेवी रु. ३०० कोटींच्या आहेत. याहि बँकांकडून कर्जरोख्यांची उचल संभवनीय आहे. वरील सर्व घटना लक्षांत घेतल्या असतां यापुढें सरकारी कर्जरोख्यांच्या किंमती अधिक सुधारतील. रोखे बाजारावर आपलें वर्चस्व निर्माण होईपर्यंत सरकारनें नवीन कर्ज उभारण्याचें लांबणीवर टाकावें.

**भांडुपला नवा कारखाना**— ऑटोमोबाईल प्रॉडक्टस् ऑफ इंडिया लिमिटेड ही कंपनी भांडुप येथें एक नवा कारखाना काढीत आहे. ह्या कारखान्यांत हिलमन मिंक्स ह्या मोटारगाडीचे सुटे भाग आणि कॉमर ह्या वहातुकीच्या गाडीचे सुटे भाग तयार करण्यांत येणार आहेत.

**नाभा येथें टेलिफोन एक्सचेंज**— पेप्सु राज्यांतील नाभा ह्या महत्त्वाच्या शहरीं ५० लाइन्स असणारा टेलिफोन एक्सचेंज नुकताच उघडण्यांत आला. पेप्सु राज्यांतील दळणवळण वाढ-

### विमा व्यवसायांतील आजच्या कांहीं मुख्य अडचणी

विमा व्यवसायांतील सध्याच्या मुख्य अडचणींचा उल्लेख श्री. टी. सी. कपूर यांनीं असोसिएशन ऑफ म्यूच्युअल लाइफ ऑफिसेस्‌च्या वार्षिक सभेपुढें पुढील शब्दांत केला. (१) अलिकडे मोठाल्या व ख्यातनाम विमा कंपन्यांचें खर्चाचें प्रमाण अतिशय वाढलें आहे व त्यांनीं याबाबतींत कायद्यानें मान्य केलेला उच्चांक गांठला आहे. कांहींचा खर्च कायदेशीर मर्यादेपेक्षांहि वाढला असून तो कमी करावयाचा तर अगदीं सावकाशच कमी करतां येईल. (२) स्पेशल एजंटांचे जास्तींत जास्त कमिशन १५ टक्के ठरविलें आहे. यामुळें खर्च वाढला आहे. (३) ज्या कंपन्यांना मर्यादित जागीं काम करावें लागतें अशांना कामाचा विस्तार वाढवावयाचा तर नवीन शाखा उघडून किंवा पगारी अधिकारी नेमून हा विस्तार वाढवावा लागल्यामुळें खर्चाचें प्रमाण वाढतें. (४) ४२ व (८) या कलमान्वयें १ जानेवारी १९४९ आणि १ सप्टेंबर १९५० च्या दरम्यान निवृत्त झालेल्या चीफ एजंटांना अडीच टक्के रिन्यूअल कमिशन मिळतें. पूर्वी चीफ एजंटांचें कमिशन त्यांनीं व्यवस्था ठेवण्याच्या बाबतींत केलेल्या कामगिरीवर अवलंबून असे. ४२ व (८) या कलमान्वयें निवृत्त झालेल्या चीफ एजंटांना, ते व्यवस्था ठेवण्याचें काम करावयाचें बंद झालें तरी कमिशन द्यावें लागत असल्यामुळें खर्चाचें प्रमाण वाढलें आहे. (५) १९५० च्या विमा सुधारणा कायद्यानें कंट्रोलर यांजकडे अनेक तक्ते इ. पाठवावे लागत असल्यामुळें खर्चाचें प्रमाण वाढलें आहे. (६) कांहीं मोठ्या विमा कंपन्यांकडून, आर्थिक दृष्ट्या कमी पातळीवर असणाऱ्या कंपन्यांशीं अनिष्ट स्वरूपाची स्पर्धा चालू असते. यामुळें नवीन काम मिळविण्याऐवजीं दुसऱ्यांचें काम आपणाकडे खेंचून आणण्याची अनिष्ट प्रवृत्ति बळावते.


# पुणेकरांसाठीं नवीन सोय

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. ची

डेक्कन जिमखाना शाखा हिंदविजय टॉकीजसमोर इंजिनियर, श्री. पवार, यांनीं बांधलेल्या नवीन प्रशस्त इमारतींत लवकरच जाणार आहे.

**या ठिकाणीं सेफ डिपॉझिट व्हॉल्टसची खास व्यवस्था केली आहे.**

तरी आपल्या मौल्यवान चीजवस्तू, महत्त्वाचे कागदपत्र, वगैरे सुरक्षित ठेवण्यासाठीं या सोयीचा लाभ घेऊं इच्छिणाऱ्यांनीं बँकेकडे आपलीं नांवें नोंदवावीत.

विशेष माहितीसाठीं समक्ष भेटा.

बँकेच्या पुण्यांतील शाखा :

**डेक्कन जिमखाना आणि खडकी**

मुख्य कचेरी : लक्ष्मी रोड, पुणें २.

चिं. वि. जोग,
मॅनेजर.

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

—पुणें शहर—

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

मोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जे देणें, सोनें–चांदीचे तारणावर कर्जे देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

**चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.**

**एक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.**

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

**दराबद्दल समक्ष चौकशी करावी.**

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रबडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) ||| श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. | ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. | ३,९९,३८५ |

**एकूण खेळतें भांडवल ६३ लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर
B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.

# पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.

४११ शनवार पेठ, पुणें १.

तारेचा पत्ताः—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३११५

(जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था)

**संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.**

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें; ऊंस गाळण्याचे चरक; सल्फेट व इतर खतें; पिकांच्या रोगांवरील औषधें; पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

संस्थेच्या अडत दुकानाचा पत्ता व टेलिफोन नं. ३२०५. } ११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें १.

# दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई,
स्थापन १९११

तारेचा पत्ता : फार्मर बँक
टे. नं. २५४६१ | पोस्ट बॉक्स नं. ४७२

चेअरमनः–श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. | ४८,८५,२०० |
| गंगाजळी फंड | रु. | ३९,४८,७०० |
| ठेवी | रु. | ६,९२,८४,९०० |
| खेळतें भांडवल | रु. | १३,८०,४९,८०० |

**१५ जिल्ह्यांत ६२ शाखा**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.